| | | | |
|---|---|---|---|
| MHRT100003862021 | दाखल तारीख | – | २२/०६/२०२१ |
| | नोंदणी तारीख | – | २२/०६/२०२१ |
| | निकाल तारीख | – | ०६/०६/२०२६ |
| | कालावधी | – | वर्षे महिने दिवस<br>०४ ११ १५ |

**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, राजापूर यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी - स्वरांजली एस. हाके)

**नियमित दिवाणी दावा क्र. ४७ /२०२१**
**निशाणी क्र. ७८**

**श्री. अनंत रामचंद्र नकाशे**
वय-५५ वर्षे, व्यवसाय - शेती,
रा. निखरेवाडी, मु. पो. केळवली, **...वादी.**
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

**विरुध्द**

१) **श्री. निलेश सुरेश नकाशे**
वय-३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,

२) **श्री. मिलिंद सुरेश नकाशे**
वय-२० वर्षे, व्यवसाय- काही नाही,

३) **श्रीमती मृणाल सुरेश नकाशे**
वय-३० वर्षे, व्यवसाय- नोकरी,
प्रतिवादी क्र.१ ते ३ सर्व
रा. शिवदर्शन बिल्डींग, दुसरा मजला,
रुम नं.४८, साने गुरुजी मार्ग,
सातरस्ता (पूर्व), मुंबई.

४) **श्री. राकेश रमेश उर्फ रमाकांत नकाशे**
वय-३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा. रुम नं.४०४, पांडुरंग कृपा बिल्डींग,
मनवेलपाडा रोड, साईलीला अपार्टमेंट जवळ, **...प्रतिवादी.**
वसई, विरार (पूर्व) ठाणे ४०१३०५.

५) **श्री. रोशन रमेश उर्फ रमाकांत नकाशे**
वय-३० वर्षे, व्यवसाय- नोकरी,
४ व ५ दोघेही रा. न्यू निवेदिता सोसायटी,
बी विंग, ग्राऊंड फ्लोअर, रुम नं.००३
एम.बी. इस्टेट, दत्तमंदिर रोड, बंजारा
हॉटेलच्या मागे, विरार (प.).

६) **श्रीमती अंकिता अंकुश राड्ये**
**(विवाहापूर्वीची राजश्री रमेश उर्फ**
**रमाकांत नकाशे)**
वय-२५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. न्यू निवेदिता सोसायटी, बी विंग,
ग्राऊंड फ्लोअर, रुम नं.२०२, एम.बी. इस्टेट,
दत्तमंदिर रोड, बंजारा हॉटेलच्या मागे,
विरार (प.).

७) **नरेंद्र दाजी रोडये**
वय-४२ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा. ७०३, मॉडेल रेसिडेंसी, बी. जे. मार्ग,
मुंबई नं.११.

८) **सुनिता किशोर बोभाटे**
**(विवाहापूर्वीची सुनिता दाजी रोड्ये),**
वय-४० वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. ५०३ डी विंग, भगवा महाल,
बी. जे. मार्ग मुंबई ११.

९) **ऋषीकेश दाजी रोडये**
वय-३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा. ५/१० मॉडर्न मिल कंपाऊंड,
के. के. मार्ग, मुंबई ११.

१०) **स्नेहल दाजी रोडये**
वय-३० वर्षे, व्यवसाय- नोकरी, **...प्रतिवादी.**
रा. मधुबन फ्लॅट नं.२०२, वैशाली नगर,
के. के. मार्ग, मुंबई ११.

**११)** **शितल गणपत नारकर**
**(विवाहापूर्वीची चिमा लक्ष्मण नकाशे)**
वय-५५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. ९८, हाजीकासम चाळ, ९ बी,
पहिला मजला, केशव खाडे मार्ग, मुंबई ११.

**१२)** **दिलीप तुकाराम नकाशे**
वय-५० वर्षे, व्यवसाय- नोकरी,

**१३)** **विजय तुकाराम नकाशे**
वय-४५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
प्रतिवादी क्र.१३ व १४ दोघेही रा.९/ए,
शिंदे बिल्डींग कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग,
समाज कल्याण केंद्र, लोअर परेल,
डिलाइल रोड, मुंबई ४०००१३.

**१४)** **गितीका गणेश शेटये**
**(विवाहापूर्वीची मनिषा तुकाराम नकाशे)**
वय-३५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. रुम नं.१६, सिध्दी विनायक वसाहत,
मनवेलपाडा रोड, विष्णू विहार कॉम्प्लेक्स
जवळ, विरार, ठाणे मुंबई ४०१३०३.

**१५)** **प्रकाश रामचंद्र नकाशे**
वय-५२ वर्षे, व्यवसाय- नोकरी,

**१६)** **विनया विजय कोकाटे**
**(विवाहापूर्वीची कल्पना रामचंद्र नकाशे)**
वय-४७ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,

**१७)** **नम्रता संतोष रोडये**
**(विवाहापूर्वीची पुष्पा रामचंद्र नकाशे)**
वय-४४ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
प्रतिवादी क्र.१६ ते १८ सर्व रा.स्मित टॉवर,
बी विंग, ७०१, न्यू राजीव गांधी स्कूल,
nilemore gaon, नालासोपारा (पश्चिम), **...प्रतिवादी.**
मुंबई ४०१२०३.

**१८) प्रतिभा गणपत हर्याण**
**(विवाहापूर्वीची मिना रामचंद्र नकाशे)**
वय-४२ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. मु. पो. तिथवली, ता. वैभववाडी,
जि. सिंधुदूर्ग.

**१९) भिकाजी बापू नकाशे (मयत)**
वय-८० वर्षे, व्यवसाय- काही नाही,
रा. निखरेवाडी, मु. पो. केळवली,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

**(नि.५८ वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती पुढीलप्रमाणे)**

**१) वारसः-**
**गजानन भिकाजी नकाशे**
वय-५६ वर्षे, व्यवसाय-शेती,
रा. निखरेवाडी, केळवली,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

**२) मंजुळा भिकाजी नकाशे** **...प्रतिवादी.**
वय-५४ वर्षे, व्यवसाय-गृहिणी,
रा. निखरेवाडी, केळवली,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

| | |
|---|---|
| वादीतर्फे विद्वान वकीलः– | श्रीमती पी. जी. मराठे. |
| प्रतिवादी क्र.१ व ३ तर्फे विद्वान वकीलः– | एकतर्फा चौकशी. |
| प्रतिवादीतर्फे २ व ४ ते १७ विद्वान वकीलः– | श्रीमती आर. एस. बिर्जे. |
| प्रतिवादी क्र.१८, १९(१) व १९(२) तर्फेः– | एकतर्फा चौकशी. |

... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०६/०६/२०२६ रोजी घोषीत)

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा सामाईक जमीन मिळकतीचे वाटपासाठी दाखल केलेला आहे. मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील खालील नमुद मिळकती या दाव्याचा विषय आहेत. (येथुन पुढे सदर मिळकतींना 'दावा मिळकती' असे संबोधण्यात येते.)

| अ.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. | शेतीचे स्थानिक नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९१) | १ | जिरायत ०-०२-५०<br>पो.ख. ०-००-००<br>......................<br>एकूण ०-०२-५० | ०.०९ | बोवडा सखळ |
| २ | १ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९१) | १७ | जिरायत ०-०३-००<br>पो.ख. ०-००-००<br>......................<br>एकूण ०-०३-०० | ०.२० | बोडणा सखळ |
| ३ | २ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९२) | १० | जिरायत ०-०३-००<br>पो.ख. ०-००-००<br>......................<br>एकूण ०-०३-०० | ०.०२ | गावंदर परसू |
| ४ | ३ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९३) | ३५ | जिरायत ०-०४-००<br>पो.ख. ०-००-००<br>......................<br>एकूण ०-०४-०० | ०.०५ | बोडणा सखल |
| ५ | ३ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९३) | ४५ | जिरायत ०-०४-००<br>पो.ख. ०-०३-००<br>......................<br>एकूण ०-०७-०० | ०.०३ | बोडणा सखल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९३) | ४६ | जिरायत ०-०१-००<br>पो.ख. ०-००-००<br>.......................<br>एकूण ०-०१-०० | ०.०२ | बोडणा सखल |
| ७ | ३ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९३) | ७१ | जिरायत ०-०२-००<br>पो.ख. ०-००-००<br>.......................<br>एकूण ०-०२-०० | ०.०२ | बोडणा सखल |
| ८ | ६४ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१३९) | १ | जिरायत ०-२०-००<br>पो.ख. ०-१०-००<br>.......................<br>एकूण ०-३०-०० | ०.१४ | राशीचा माळ |
| ९ | ९ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९६) | ३ | जिरायत ०-०१-००<br>पो.ख. ०-००-००<br>.......................<br>एकूण ०-०१-०० | ०.०२ | मसनवट्या नजिक |
| १० | ९ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९६) | १५ | जिरायत ०-०३-००<br>पो.ख. ०-००-००<br>.......................<br>एकूण ०-०३-०० | ०.०३ | मसनवट्या नजिक |
| ११ | ९ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९६) | १९ | जिरायत ०-०४-००<br>पो.ख. ०-०१-००<br>.......................<br>एकूण ०-०५-०० | ०.०३ | मसनवट्या नजिक |
| १२ | ९ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१९६) | ४० | जिरायत ०-०४-००<br>पो.ख. ०-००-००<br>.......................<br>एकूण ०-०४-०० | ०.०३ | मसनवट्या नजिक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | ९४ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१७३) | ९ | जिरायत ०-०३-००<br>पो.ख. ०-००-००<br>......................<br>एकूण ०-०३-०० | ०.०२ | गावंदर नजिक |
| १४ | ५१ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१३१) | १ | जिरायत ०-१९-५०<br>पो.ख. ०-०२-००<br>......................<br>एकूण ०-२१-५०<br>पैकी आठ आणे | ०.३६ | आवळीचा माळ |
| १५ | ५७ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१६९) | ६अ | जिरायत ०-१९-५०<br>पो.ख. ०-१०-००<br>......................<br>एकूण ०-२९-५०<br>पैकी आठ आणे | ०.२३ | भराडे |
| १६ | ७० (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१४८) | १५ | जिरायत ०-०८-५०<br>पो.ख. ०-०२-००<br>......................<br>एकूण ०-१०-५०<br>पैकी आठ आणे | ०.०५ | शेवरी सखल |
| १७ | ९६ (पूर्वीचा मौजे केळवली स.नं.१७२) | ३३ | जिरायत ०-०३-००<br>पो.ख. ०-००-००<br>......................<br>एकूण ०-०३-००<br>पैकी आठ आणे | ०.०३ | खापरा आंब |

येणेप्रमाणे जमीन मिळकती यातील झाड–माड, जल–तरु, काष्ट, पाषाण, जाण्या येण्याच्या वाटा, इजमेंटरी राईट्स तसेच सदर जमिनीतील जडजोखीम व तद्ंगभूत हक्कांसह सर्व मिळकत सदर दाव्याचा विषय असलेल्या मिळकती आहेत. सदर मिळकतींना सोयीसाठी यापुढे **'दावा मिळकती'** असे संबोधण्यात येते.

## ०२. वादी पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

सदर वर नमूद मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांच्या कुटूंबाच्या सामाईक मालकी वहिवाटीच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे कुटुंबाचे मूळ पुरुष हे रघुनाथ नारशेट नकाशे हे होते. ते सन १९५७ चे पूर्वीच मयत झाले आहेत. सदर मूळ पुरुष रघुनाथ यांना लक्ष्मण, रामचंद्र व तुकाराम हे मुलगे होते. सदर तिघेही मुलगे मयत असून त्यापैकी लक्ष्मण यांचे निधन सन २००० साली झाले. त्यांना अन्नपूर्णा ही पत्नी व दत्ताराम, सुरेश, रमेश उर्फ रमाकांत, शांताबाई तीच विवाहानंतरची संगिता राड्ये, चिमा तिच विवाहानंतरची शितल अशी पाच मुले होती. पैकी पत्नी अन्नपूर्णा ही मयत असून मुलगा दत्ताराम हा अविवाहीत मयत झाला. सदर लक्ष्मण यांचा दुसरा मुलगा सुरेश हा सन २००४ चे मानाने मयत असून त्याला निलेश तेच प्रतिवादी क्र.१ व मिलिंद तेच प्रतिवादी क्र.२ हे मुलगे व मृणाल तीच प्रतिवादी क्र.३ ही मुलगी असे हयात वारस आहेत. लक्ष्मण यांचा तिसरा मुलगा रमेश उर्फ रमाकांत हे मयत असून त्यांना रेश्मा ही पत्नी जी सन २००२ चे मानाने मयत आहे व मुलगे राकेश तेच प्रतिवादी क्र.४, रोशन तेच प्रतिवादी क्र.५ व राजश्री (विवाहानंतरची अंकिता अंकुश राड्ये) तिच प्रतिवादी क्र.६ असे हयात वारस आहेत. लक्ष्मण यांचे वारसांपैकी त्यांची मुलगी शांताबाई तिच विवाहानंतरची संगिता दाजी रोड्ये ही मयत असून तिचे पती दाजी हे देखील मयत आहेत. सदर शांताबाई यांना नरेंद्र हा मुलगा तोच प्रतिवादी क्र.७, सुनिता तीच विवाहानंतरची सुनिता किशोर बोभाटे ही मुलगी जी सदर कामी प्रतिवादी क्र.८ आहे तसेच ऋषीकेश व स्नेहल हे मुलगे जे सदर कामी प्रतिवादी क्र.९ व १० आहेत असे एकूण चार कायदेशीर वारस आहेत. लक्ष्मण यांची पाचवी मुलगी चिमा तिच विवाहानंतरची शितल गणपत नारकर ही हयात असून ती सदरकामी प्रतिवादी क्र.११ आहे.

०३. वादींचे पुढे कथन असे की, मूळ पुरुष रघुनाथ यांचा दुसरा मुलगा रामचंद्र तेच वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे वडील हे सन २०१६ चे मानाने मयत असून त्यांची पत्नी सिताबाई तिच वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांची आई ही सन २००७ चे मानाने मयत आहे. सदर रामचंद्र यांना अनंत म्हणजेच वादी, प्रकाश तेच प्रतिवादी क्र.१५, कल्पना म्हणजेच विवाहानंतरची विनया (कल्पना) विजय कोकाटे तीच प्रतिवादी क्र.१६, पुष्पा तीच विवाहानंतरची नम्रता संतोष रोड्ये जी सदर कामी प्रतिवादी क्र.१७ आहे व मिना विवाहानंतरची प्रतिभा गणपत हर्याण तिच प्रतिवादी क्र.१८ हे वारस आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ ही एकमेकांची सख्खी भावंडे असून सदर दावा वादी यांनी स्वतःचे व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे हक्क हितसबंधांचे रक्षणासाठी केलेला असून सदर कामी वादींनी प्रतिवादी क्र.१५ ते १८ विरुध्द कोणतीही दाद मागितलेली नाही. वादींना आपला हिस्सा प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे सोबत सामाईकात हवा आहे. मूळ पुरुष रघुनाथ यांना तुकाराम नावाचा तिसरा मुलगा होता. तो देखील सन २००९ चे मानाने मयत असून त्यांची पत्नी कांता ही सन २००७ चे मानाने मयत आहे. सदर तुकाराम यांना दिलीप तोच प्रतिवादी क्र.१२, विजय तोच प्रतिवादी क्र.१३ व मनिषा म्हणजेच विवाहानंतरची गितीका गणेश शेट्ये तिच सदर कामीची प्रतिवादी क्र.१४ हे हयात वारस आहेत. येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे कुटूंबाची वंशावळ असून सदर वंशावळ माहितीसाठी सदर दाव्यासोबत परिशिष्ट क्र.१ सोबत हजर केली आहे. सदर परिशिष्ट देखील सदर दाव्याचा भाग समजण्यात यावा. सदर कामीचे प्रतिवादी क्र.१९ हे वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वंशावळीतील नाहीत. मात्र ते दावा मिळकतींपैकी अ.क्र.१४ ते १७ या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ सोबत निम्म्या हिश्श्याचे सहमालक असून अधिकार अभिलेख सदरी देखील त्यांचे नाव नमूद असलेमुळे त्यांना सदर कामी प्रतिवादी केलेले आहे. प्रत्यक्षात सदर दावा

मिळकतींपैकी अ.क्र.१४ ते १७ या मिळकतींमध्ये असलेल्या प्रतिवादी क्र.१९ यांचे निम्मे हिश्श्याबाबत वादींची कोणतीही तक्रार नाही. सदर कामी वादींनी प्रतिवादी क्र.१९ यांचे विरोधात कोणतीही दाद देखील मागितलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१९ यांनी सदर दाव्याचे कामी हजर होणेची आवश्यकता नाही. त्यांचे खर्चास वादी जबाबदार नाहीत.

**०४.** वादींचे पुढे कथन असे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे कुटूंबाच्या सामाईक मालकी वहिवाटीच्या मिळकती होत्या व आहेत. सदर मिळकतींना लक्ष्मण रघु उर्फ रघुनाथ नकाशे म्हणजेच सदर कामीचे प्रतिवादी क्र.१ ते ११ यांचे पूर्वाधिकारी यांचे नाव वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे एकत्र कुटूंबासाठी म्हणून रेकॉर्ड ऑफ राईट कायद्याचा अंमल अधिकार अभिलेख सदरी देते वेळी दाखल झाले. सदर लक्ष्मण हे मूळ पुरुष रघुनाथ यांचा मोठा मुलगा होता व ते रघुनाथ यांचे हिंदू अविभक्त कुटुंबाचे पुढारी होते. वर नमूद दावा मिळकतींपैकी अ.क्र.११ व १२ या मिळकती सदर लक्ष्मण यांनी वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे कुटूंबासाठी कुळ वहिवाटीने प्राप्त केलेल्या असून मौजे केळवली येथील फेरफार क्र.१९५६ व २३८८ नुसार त्यांची कुळ कायद्याअंतर्गतची विक्री सदर लक्ष्मण रघुनाथ नकाशे यांचे नावे झाली. तसेच उर्वरित मिळकती या सदर लक्ष्मण यांना तोंडी वाटपाने व वहिवाटीने वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे कुटूंबासाठी संपादित केल्या होत्या व आहेत. मात्र, सदर मिळकतींचे अधिकार अभिलेख सदरी लक्ष्मण रघु उर्फ रघुनाथ नकाशे मयत झालेनंतर केवळ त्यांचे वारसांचीच नावे दाखल झाली. लक्ष्मण यांचे हयातीत सदर लक्ष्मण यांचे सख्खे भाऊ रामचंद्र व तुकाराम म्हणजेच सदर कामीचे वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १८ यांचे पूर्वाधिकारी यांची नावे अधिकार अभिलेख सदरी कुटूंबातील परस्पर विश्वासाचे संबंधामुळे दाखल करण्याची गरज भासली नाही. मात्र सदर मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे कुटूंबाच्या

सामाईक मालकी वहिवाटीच्या होत्या व आहेत.

०५. वादींचे पुढे कथन असे की, पूर्वी सदर मिळकती या मौजे केळवली, ता. राजापूर या गावात समाविष्ट होत्या मात्र सदर केळवली गावाचे विभाजन झालेवर सदर मिळकती या मौजे निखारेवाडी, ता. राजापूर या गावी समाविष्ट झालेल्या आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १८ यांचे नावे अन्य कोठेही जमीन मिळकत नाही. दरम्यानचे काळात नोव्हेंबर २०१९ चे दरम्याने प्रतिवादी क्र.१ यांनी देखील वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १८ हे त्यांचे सहहिस्सेदार असलेबाबत लेखी संमती तथा प्रतिज्ञापत्र दिले होते. त्यानुसार दावा मिळकतींचे ७/१२ सदरी नावे दाखल करुन मग वाटप करावयाचे ठरले होते. त्यानुसार दावा मिळकतींचे ७/१२ सदरी नावे दाखल करुन मग वाटप करावयाचे ठरले होते. त्यानुसार नावे दाखल करणेकरीता महसूल खात्याकडे वादींनी प्रयत्न केले असता ६क उताऱ्यांमध्ये वादी किंवा त्यांचे वडीलांचे नाव आढळून येत नसलेमुळे महसूल खात्याने वादी तसेच अन्य प्रतिवादींची नावे दाखल करण्यास नकार दिला. तसेच वादींनी प्रतिवादी क्र.१ यांचेकडे जानेवारी २०२० चे दरम्याने दावा मिळकतींचे वाटपाची मागणी केलेवर त्यांनी ''मी माझे परीने जे जमले ते तुमच्यासाठी केले आहे, आता तुम्हाला जर वाटप हवे असेल तर तुम्ही कायदेशीर मार्गाने जावे, मात्र मी मुंबई येथे राहत असल्यामुळे मला माझे नोकरीमुळे वेळोवेळी गावी येणे शक्य होणार नाही'' असे सांगितले. त्यामुळे आता सदर वडीलोपार्जित सामाईक मालकी वहिवाटीच्या दावा मिळकतींचे मे. न्यायालयामार्फत रितसर वाटप मागणेशिवाय अन्य कोणताही पर्याय वादींकडे राहिलेला नाही.

०६. वादींचे पुढे कथन असे की, सदर दावा हा दावा मिळकतींचे वाटपासाठी वादींनी दाखल केलेला असून वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाची वंशावळ सदर दाव्याचे परिशिष्ट १ येथे जोडण्यात आलेली आहे. मूळ पुरुष रघुनाथ यांचे तीन

वारस लक्ष्मण, रामचंद्र व तुकाराम हे होते. वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ हे सदर रामचंद्र यांचे वारस असलेमुळे वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीत एकत्रात १/३ इतका हिस्सा आहे. प्रतिवादी क्र.१ ते ११ हे मूळ पुरुष रघुनाथ यांचा मोठा मुलगा लक्ष्मण यांचे वारस असून त्यांचा सदर दावा मिळकतींमध्ये एकत्रात १/३ हिस्सा आहे. तसेच प्रतिवादी क्र.१२ ते १४ हे मूळ पुरुष रघुनाथ यांचा मुलगा तुकाराम यांचे वारस असलेमुळे त्यांचा एकत्रात १/३ हिस्सा आहे. तरी वादी यांनी अशी विनंती केली आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे दावा मिळकतीतील एकत्रात १/३ हिश्श्याचे सरस–निरस तुटक वाटप करण्यात येऊन वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे हिश्श्याचे क्षेत्राचा ताबा एकत्रात देण्यात यावा तसेच दावा मिळकतीचे वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ प्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात यावे.

**०७. <u>प्रतिवादी क्र.२ व ४ ते १७ यांचे निशाणी क्र.५२ कडील कैफियतीमधील थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः</u>**

प्रतिवादी क्र.२ व ४ ते १७ यांनी त्यांचे कैफियतीमध्ये कथन केले की, सदर कामी वादींनी वाटपासाठी दावा केला आहे. सदर दावा त्यांना मान्य व कबूल असून वादींचे म्हणण्याप्रमाणे वाटप होणेस त्यांच्यापैकी कोणाचीही हरकत नाही. सदर वाटप होऊन वादींनी दाव्यात दिलेल्या हिश्श्येराशीप्रमाणे त्यांचा हिस्सा त्यांना मिळावा.

**०८.** प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.१ व ३ यांना दाव्याचे समन्सची बजावणी होवून देखील ते प्रस्तुत दाव्याचे कामी हजर झालेले नाहीत त्यामुळे माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी दि.०७/१०/२०२२ रोजी निशाणी क्र.१ वरती आदेश पारित करुन प्रतिवादी क्र.१ व ३ यांचेविरुध्द एकतर्फा सुनावणीचे आदेश पारित

केलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१८ यांना प्रस्तुत दाव्याचे समन्सची बजावणी होवून ते दाव्याचे कामी हजर झालेले नसल्यामुळे दि.११/०८/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१८ विरुध्द तसेच प्रतिवादी क्र.१९(१) व १९(२) यांना देखील दावा समन्सची बजावणी होवून ते या दाव्याचे कामी हजर झाले नसल्यामुळे दि.०५/०३/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१९(१) व १९(२) यांचे विरुध्द माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.०१ वरती एकतर्फा सुनावणीचे आदेश पारित केलेले आहेत.

**०९.** वादीने दाव्याच्या पुष्ट्यर्थ स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.६५) दाखल केलेले आहे. सदर पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये वादीने दाव्यातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. तसेच याकामी वादीने त्याचे दाव्याचे पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत.

| **अ.क्र.** | **कागदपत्रांचे वर्णन** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.१, हि.नं.१ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.६ |
| २ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.१, हि.नं.१७ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.७ |
| ३ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.२, हि.नं.१० चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.८ |
| ४ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.३, हि.नं.३५ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.९ |
| ५ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.३, हि.नं.४५ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.३, हि.नं.४६ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.११ |
| ७ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.३, हि.नं.७१ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१२ |
| ८ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.६४, हि.नं.१ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१३ |
| ९ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.९, हि.नं.३ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१४ |
| १० | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.९, हि.नं.१५ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१५ |
| ११ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.९, हि.नं.१९ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१६ |
| १२ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.९, हि.नं.४० चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१७ |
| १३ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.९४, हि.नं.९ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१८ |
| १४ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.५१, हि.नं.१ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.१९ |
| १५ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.५७, हि.नं.६ अ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.२० |
| १६ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.७०, हि.नं.१५ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.२१ |

| | | |
|---|---|---|
| १७ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील स.नं.९६, हि.नं.३३ चे सातबारा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.२२ |
| १८ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील खाते क्र.९५ चा गाव नमुना आठ–अ चा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.७१ |
| १९ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील खाते क्र.१५१ चा गाव नमुना आठ–अ चा उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.७२ |
| २० | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.५७८ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.३०/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.२३ |
| २१ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.५७९ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.३०/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.२४ |
| २२ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.८३३ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.१३/०२/२०१७ रोजीचा | निशाणी क्र.२५ |
| २३ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.९०४ व ९०५ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.१३/०२/२०१७ रोजीचा | निशाणी क्र.२६ |
| २४ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.१०१३ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.२७ |
| २५ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.११६१ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.१३/०२/२०१७ रोजीचा | निशाणी क्र.२८ |
| २६ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.१६७५ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.१३/०२/२०१७ रोजीचा | निशाणी क्र.२९ |
| २७ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.१७१८ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.३०/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.३० |

| | | |
|---|---|---|
| २८ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.१९५६ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.३१ |
| २९ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.२१७० चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.३०/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.३२ |
| ३० | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.२३४० चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.३३ |
| ३१ | मौजे केळवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.२३८८ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.२५/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.३४ |
| ३२ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.१ च्या फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.३०/०३/२०२१ रोजीचा | निशाणी क्र.३५ |
| ३३ | मौजे निखारेवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील फेरफार क्र.१४२ चा फेरफार उताऱ्याची सहीसुद नक्कल दि.१३/०२/२०१७ रोजीचा | निशाणी क्र.३६ |
| ३४ | वादीतर्फे प्रतिवादी क्र.१ यांनी तलाठी सजा केळवली, ता. राजापूर यांना दि.०६/११/२०१९ रोजी दिलेल्या अर्जाची अस्सल प्रत. | निशाणी क्र.६८ |
| ३५ | प्रतिवादी क्र.१ यांनी मा. कार्यकारी दंडाधिकारी ता. राजापूर जि. रत्नागिरी यांचे समोर दि.०६/११/२०१९ रोजी वंशावळी संबंधात तसेच सह हिस्सेदार म्हणून नावे दाखल करण्यासाठी केलेले प्रतिज्ञापत्राची अस्सल प्रत. | निशाणी क्र.६९ |
| ३६ | प्रतिवादी क्र.१ यांनी मा. कार्यकारी दंडाधिकारी ता. राजापूर जि. रत्नागिरी यांचे समोर दि.०६/११/२०१९ रोजी केलेले प्रतिज्ञापत्राची अस्सल प्रत. | निशाणी क्र.७० |

वादीतर्फे निशाणी क्र.७४ येथे अधिक पुरावा देणेचा नसलेबाबतची पुरशिस दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.२, ४, ५ ते १७ तर्फे निशाणी क्र.७५ येथे अधिक पुरावा देणेचा नसेलबाबतची पुरशिस दाखल केलेली आहे.

**१०.** दोन्ही बाजुंचे कथन लक्षात घेता खालील मुद्दे निश्चीत करणेत आले. त्यांचेवरील निष्कर्ष हे खाली नमुद केलेल्या कारणांसह मी नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दावा मिळकतींमधील वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे एकत्रातील १/३ हिश्याचे सरस-निरस वाटप होऊन मिळण्यास वादी पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| २) | वादी दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचेकरीता एकत्रात १/३ हिश्श्याच्या क्षेत्राचा ताबा मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| ३) | सदर दावा मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून दावा मिळकतीचे वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ प्रमाणे करणेचा आदेश मिळविणेस वादी पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| ४) | आदेश कोणते व हुकूमनामा काय? | दावा मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**११.** वादी श्री. अनंत रामचंद्र नकाशे यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.६५) दाखल केलेले आहे. त्यानंतर वादीतर्फे तोंडी पुरावा संपल्याची लेखी पुरशिस (नि.क्र.७४) दाखल केलेली आहे.

**१२.** प्रतिवादींतर्फे कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा या दाव्याचे अभिलेखावर सादर केलेला नाही. तथापी प्रतिवादी क्र.२, ४ ते १७ यांनी त्यांना अधिक तोंडी पुरावा देणे नसलेबाबतची पुरशिस (नि.क्र.७५) याकामी दाखल केलेली आहे.

**१३.** पुराव्याच्या विवेचनाला सुरुवात करण्यापूर्वी काही गोष्टींची नोंद घेणे आवश्यक ठरते. त्यामध्ये प्रतिवादी क्र.२ व ४ ते १७ या दाव्याचे कामी उपस्थित झाले असुन त्यांनी निशाणी क्र.५२ येथे या दाव्यास कैफियत देवून कथन केले की वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी केलेला असून सदरील दावा त्यांना मान्य व कबूल असून वादींचे म्हणण्याप्रमाणे वाटप होणेस त्यांच्यापैकी कोणाचीही हरकत नाही. सदर वाटप होऊन वादींनी दाव्यात दिलेल्या हिश्श्येराशीप्रमाणे त्यांचा हिस्सा त्यांना मिळावा. सदर प्रतिवादी क्र.२ व ४ ते १७ तर्फे वादीच्या मागणीला आक्षेप घेणारी कैफियत अभिलेखावर सादर करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत :-**

**१४.** मुद्दा क्र.१ ते ३ हे सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनर्रावृत्ती टाळण्यासाठी मुद्दा क्र.१ ते ३ हे एकत्रितरित्या चर्चेसाठी घेतले आहेत.

**१५.** वादीने वर नमुद केलेप्रमाणे या दाव्याचे अभिलेखावर दावा मिळकतीचे सातबारा उतारे, फेरफार उतारे तसेच इतर तत्सम कागदपत्रे दाखल करुन ती शाबीत केलेली आहेत. अर्थातच, सदर कागदपत्रांच्या शाबितीविषयी प्रतिवादींकडून कोणताही आक्षेप अभिलेखावर नोंदवण्यात आलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र.२, ४ ते १७ यांनी दाव्याचे कामी हजर झाल्यानंतर याकामी कोणताही कागदोपत्री पुरावा देखील दाखल केलेला दिसून येत नाही.

**१६.** प्रस्तुत दाव्याचे अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमूद सर्व दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्रित सामाईक मालकीच्या असून त्या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या असल्याचे स्पष्ट होते. तसेच वादी यांच्या दाव्यातील कथनांना याकामी कोणीही आक्षेप नोंदविलेला

नाही. त्यामुळे वादींनी दाव्यासोबत दाखल केलेल्या कुटूंब वंशावळीवरुन मूळ पुरुष रघुनाथ यांचे तीन वारस असून त्यांची नावे लक्ष्मण, रामचंद्र व तुकाराम असल्याचे दिसून येते. त्यावरुन वादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ हे रामचंद्र यांचे वारस असल्यामुळे वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचा दावा मिळकतीत एकत्रात १/३ इतका हिस्सा आहे. प्रतिवादी क्र.१ ते ११ हे मूळ पुरुष रघुनाथ यांचा मोठा मुलगा लक्ष्मण यांचे वारस असून त्यांचा सदर दावा मिळकतींमध्ये एकत्रात १/३ हिस्सा आहे तसेच प्रतिवादी क्र.१२ ते १४ हे मूळ पुरुष रघुनाथ यांचा मुलगा तुकाराम यांचे वारस असल्यामुळे त्यांचा एकत्रात १/३ हिस्सा आहे. त्यामुळे वादी यांनी या दाव्यात मागणी केलेप्रमाणे ते त्यांचे मुळ पुरुष रघुनाथ नंतर रामचंद्रचे वारस असल्याने दावा मिळकतीमधील रामचंद्रच्या हिश्श्याकरीता वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचा दावा मिळकतीतील एकत्रात १/३ हिश्श्याचे सरस–निरस तुटक वाटप करण्यात येऊन वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे हिश्श्याचे क्षेत्राचा ताबा एकत्रात देण्यात यावा तसेच दावा मिळकतीचे वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ प्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात यावे असे नमुद केलेले आहे. या सर्व नमुद बाबींमुळे दावा मिळकतींमध्ये रामचंद्रचे वारस म्हणून वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचा हक्क असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांचा त्यामध्ये हिस्सा असल्याचे शाबीत झालेले आहे.

**१७.** प्रस्तुतचे कामी देखील प्रतिवादी क्र.२, ४ ते १७ यांनी वादकथनपत्रामधील वादीच्या आक्षेपाविषयी अगर कथनांविषयी प्रत्युत्तरादाखल त्यांनी वादीचा दावा व अनुतोष मान्य करणारी कैफियत (नि.क्र.५२) अभिलेखावर दाखल करुन त्याप्रमाणे निकाल होवून हुकूमनामा तयार करणेकरीता विनंती केली आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी वादी यांचा उलटतपास देखील सदर प्रतिवादी यांनी घेतललेला नसल्यामुळे प्रतिवादींविरुध्द उलटतपास नाही असा आदेश माझे

पूर्वाधिकारी यांनी केलेला आहे. त्यामुळे वादीला त्यांचे दाव्यातील कथनांच्या पार्श्वभूमीवर अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्याचे साकल्याने अवलोकन केले.

**१८.** वादीनी सदर दावा मिळकतींधील १/३ हिश्श्याचे सरस–निरस तुटक वाटप करण्यात येऊन वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचे हिश्श्याचे क्षेत्राचा ताबा एकत्रात देण्यात यावा असे कथन केलेले आहे. सदरची बाब उर्वरित प्रतिवादी क्र.२ व ४ ते १७ यांनी नाकारलेली नाही. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचा एकत्रात १/३ हिस्सा असल्याचे शाबीत होते. त्यामुळे वादी मागतात त्याप्रमाणे दावा मिळकतीमधील त्यांच्या व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांच्या एकत्रातील १/३ हिश्याचे सरस निरस वाटप करुन मागण्याचा हक्क रहातो. त्यामुळे दावा मिळकतींचे वाटपाकरिता दावा मा. जिल्हाधिकारी यांचेकडे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ अन्वये पाठविणे क्रमप्राप्त आहे. सबब, वरील सर्व पुराव्याचे विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर वादीच्या बाजुने होकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत</u> :-**

**१९.** वादीने दाव्यातील कथने शाबीत केलेली आहेत. तर प्रतिवादी क्र.२ व ४ ते १७ यांनी दाव्याचे कामी हजर होवून दावा मान्य व कबूल असल्याबाबत कैफियत (नि.क्र.५२) अभिलेखावर सादर केलेली असल्यामुळे दाव्याचे कामी उद्‌भवलेली विशिष्ट परिस्थिती पाहता दाव्याचा खर्च कोणा एका पक्षकारावर लादणे न्यायोचीत ठरत नाही. पर्यायाने, मुद्दा क्र.४ च्या उत्तराकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१) प्रस्तुतचा दावा मंजूर करण्यात येतो.

२) दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांचा एकत्रितपणे १/३ हिस्सा असल्याचे जाहीर करणेत येते.

३) वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ हे त्यांच्या दावा मिळकतींमधील १/३ हिश्यानुसार सरस- निरस वाटप करुन मिळण्यास पात्र असल्याचे जाहीर करणेत येते.

४) वादी व प्रतिवादी क्र.१५ ते १८ यांना दावा मिळकतींमध्ये १/३ हिश्यानुसार ताबा एकत्रात मिळणार असल्याचे जाहीर करणेत येते.

५) दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये दावा मिळकतीचे वाटप मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत होण्याकरीता आज्ञापत्र (precept) पाठवण्यात यावे.

६) दाव्याचा खर्च पक्षकारांनी आपापला सोसणेचा आहे.

७) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.06.06 17:14:26 +0530

**राजापूर.** **(एस. एस. हाके)**
**दिनांक:-०६/०६/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**राजापूर.**

**CERTIFICATE**

"Judgment/Order in :- Regular Civil Suit No. 41/2021

I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.

Name of Stenographer:- M. N. Patil

Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.

Date of Decision :- 06-06-2026

Judgment signed by P.O. on :- 06-06-2026.

Judgment uploaded on :- 06-06-2026.